सोनेतारण कर्ज
१० ग्रॅमसाठी १२%
रु. ७०,०००/-
फक्त १० मिनिटात
मुदतठेव १३ महिने १०% | वाहन कर्ज योजना १५% | दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०५.११.२०२५ | अंक नं. १७८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



92.5% शुध्द चांदीमधील
आकर्षक कडे, ब्रासलेट, चेन, पेंडट, अंगठी व टॉप्सच्या असंख्य व्हरायटी.

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# पाऊस थांबला तरी नगर शहरातील रस्त्यांची कामे अद्यापही आहेत ठप्पच



## खोदलेले रस्ते, धुळीमुळे नागरिक हैराण, मनपाचे अधिकारी, ठेकेदारही फिरकेनात

नगर – महापालिकेने मागील वर्ष दीड वर्षापासून शहरासह उपनगरी भागात एकाच वेळी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, ड्रेनेज लाईनची कामे मोठ्या प्रमाणात सुरु केली. त्यासाठी रस्ते खोदून ठेवले, मात्र यातील अनेक रस्त्यांची कामे सध्या ठप्प आहेत. खोदलेले रस्ते, उघडी गटारे, खडी, माती आणि धुळीमुळे नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. या रस्त्यांच्या कामाच्या साईटवर महापालिकेचे अधिकारी, ठेकेदाराची माणसे फिरकत नाहीत. पाऊस थांबला असला तरी कामे मात्र सुरु न झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

मागील वर्षी विधानसभा निवडणुका जाहीर होण्या पूर्वी शहरासह उपनगरातील अनेक रस्त्यांची कॉंक्रीटीकरण, ड्रेनेज लाईनची कामे महापालिकेने सुरु करून रस्ते खोदले. त्यास आता दीड वर्ष होत आले आहे. या कालावधीत काही कामे कशी बशी पूर्ण झाली, तर काही अर्धवट स्थितीत रखडलेली आहेत.


*(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)*


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिल यांच्याबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **१० दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता.०५/११/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील, **मौजे शहर अहिल्यानगर येथील लालटाकी भागातील** खालील वर्णनाची प्लॉटसह बांधकाम केलेली व हॉटेल अमर या नावाने ओळखले जाणारी मिळकत – **सिटी सर्व्हे नंबर ७३७० पैकी खालील वर्णनाच्या मिळकती –**

| सब प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मीटर | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्व | दक्षिण | पश्चिमेस | उत्तरेस |
| २ | ४६८.०० | प्लॉट नं.१९ व २० | प्लॉट नं.१ | नगर-मनमाड रस्ता | प्लॉट नं.३ |
| १९ | ५१३.०० | ३०.०० फूट रुंदीचा रस्ता | प्लॉट नं.२० | प्लॉट नं. २ व ३ | प्लॉट नं.११ |
| २० | ४६९.०० | ३०.०० फूट रुंदीचा रस्ता | प्लॉट नं.२१ | प्लॉट नं. १ व २ | प्लॉट नं. १९ |

असे वर नमूद तिन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ १४५०.१६ चौ.मीटर हा संपूर्ण प्लॉट व त्यावर आरसीसीमध्ये बांधकाम केलेले इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्र २५४५.१६ चौ.मीटर ही प्लॉटसह बांधकाम केलेली मिळकत.

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**

**१. गौरव प्रेमभुषण नय्यर,** रा. टॉप अप पेटोल पंप मागे, घर नं. ३२, यशवंत कॉलनी, छत्रपती संभाजी रोड, अहिल्यानगर.
**२. सुनिल कुलबीरराज नय्यर,** रा. टॉप अप पेटोल पंप मागे, घर नं. ३२, यशवंत कॉलनी, छत्रपती संभाजी रोड, अहिल्यानगर.
**३. सुजित कुलबीरराज नय्यर,**
रा. बी-६०३, गार्डन एन्क्लेव्ह, पोखरणा रोड नं.२, सीद्दाचल जवळ, वसंत विहार, अपना बाजार, ठाणे-४००६१०.
**४. गणेश कुलबीरराज नय्यर,** रा. टॉप अप पेटोल पंप मागे, घर नं. ३२, यशवंत कॉलनी, छत्रपती संभाजी रोड, अहिल्यानगर.

**ऑड.समीर वखारे**
पत्ता :- ऑफीस नं.५, पहिला मजला,साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. 901 1678999. 9860805559


SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999



|| OM SAI RAM ||
NOW OPEN
atithi™ VEG
Pune | Ahilyanagar | Jalna
AP Crystal, Opp. Daule Hospital, Nagar-Manmad Road, Savedi, Ahilyanagar - 414003.
☎ : 70835 42424 / 70385 42424

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com




अतिवृष्टीने बाधित गावातील नुकसानीची केंद्रीय पथकाकडून पाहणी करताना ग्रामस्थांशी संवाद साधून नुकसानीचा घेतला सविस्तर आढावा घेताना जिल्हाधिकारी पंकज आशिया आदी.

## बंद पथदिवे तातडीने सुरु करावेत अन्यथा तीव्र आंदोलन करणार



महेंद्र गंधे

नगर – सावेडी व गुलमोहर रोड भागातील बहुतांशी पथदिवे अनेक महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे अंधाराचा फायदा घेऊन याभागात वारंवार चोऱ्या तसेच चेन स्नॅचिंग घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बंद पथदिव्यांबाबत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून तसेच संबधित कंपनीच्या अधिकाऱ्यांकडेही वारंवार तक्रारी करूनही टाळाटाळ करत कुठल्याही प्रकारची दखल घेत नाहीये. संबधित कंपनी नियुक्त अधिकारी निलेश पगारे हे कधीही फोन उचलत नाहीत. त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त असून संताप व्यक्त करत आहेत. या भागात होणाऱ्या चोरांच्या घटनांना पथदिवे लावणारी संबधीत कंपनीच जबाबदार आहे. त्यामुळे महानगरपालिकेने गुलमोहर रोड परिसरातील पथदिवे त्वरित दुरुस्त करून सुरु करवेत अन्यथा महानगरपालिकेत आंदोलन करण्यात येईल, अशा इशारा भाजपचे माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांनी दिला.

महेंद्र गंधे यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देऊन पथदिवे दुरुस्त न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# नगर जिल्ह्यात अतिवृष्टीने बाधित गावातील नुकसानीची 'केंद्रीय पथकाकडून' पाहणी

### ग्रामस्थांशी संवाद साधून नुकसानीचा घेतला सविस्तर आढावा

नगर – जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती, घरे, रस्ते, पूल, वीज व पाणीपुरवठा तसेच सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या उच्चस्तरीय केंद्रीय पथकाने ५ नोव्हेंबर रोजी पाथर्डी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पथकाचे नेतृत्व भारत सरकारच्या सहसचिव आर. के. पांडे यांनी केले. त्यांच्यासोबत कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संचालक डॉ. अरविंद वाघमारे, तसेच गृह मंत्रालयाचे आशिष गौर, उपस्थित होते.

पथकासोबत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे व इतर अधिकारी उपस्थित होते.

पथकाने पाथर्डी तालुक्यातील करंजी, देवराई, पारेवाडी व सोमठाणे खुर्द या गावांना भेट दिली. करंजी येथे राष्ट्रीय महामार्गावरील नुकसानग्रस्त पुलाची पाहणी करण्यात आली. यावेळी पावसाचे पाणी घरात शिरल्याने नुकसान झालेल्या ग्रामस्थ राजेंद्र पारेकर यांच्याशी पथकाने संवाद साधून परिस्थितीची माहिती घेतली.

तसेच शेतकरी बबनराव दानवे यांच्या संत्रा फळबागेची व पावसामुळे खरडून गेलेल्या जमिनीची पाहणी केली. यावेळी पथकाने भविष्यात अशा आपत्तीजनक परिस्थिती उद्भवू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यानंतर पथकाने देवराई येथील बंधारे व पारेवाडी येथील पाण्यामुळे क्षतिग्रस्त झालेल्या पुलाचीही पाहणी केली. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त पुलांची व बंधाऱ्यांची सविस्तर माहिती घेत पथकाने आवश्यक त्या ठिकाणी पुनर्बांधणी करण्याच्या सूचना दिल्या.

तसेच सोमठाणे खुर्द येथील शेतकरी मोहन शिदोरे यांच्या शेतातील तूर व बाजरी पिकांचे झालेले नुकसान प्रत्यक्ष पाहून पथकाने संबंधित अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना दिलेल्या तातडीच्या मदतीची माहितीही जाणून घेतली.

केंद्रीय पथकाने संपूर्ण पाहणीदरम्यान ग्रामस्थांशी संवाद साधत नुकसानग्रस्तांना दिलासा देत त्यांच्या नुकसानीची माहिती जाणून घेतली.

# पाऊस थांबला तरी नगर शहरातील रस्त्यांची कामे अद्यापही आहेत ठप्पच

(पान १ वरुन)

कोणती कामे रखडली, ती कशामुळे बंद आहेत, याचा आढावा घ्यायला महापालिकेचे अधिकारी फिरकत नाहीत. ठेकेदारही मनमानी पद्धतीने ही कामे करत आहेत. याचा मोठा त्रास मात्र नागरिकांना सहन करावा लागत आहे.

एकविरा चौक ते पारिजात चौक ते बी.एस. एन.एल. ऑफिस समतानगर रस्त्याचे काम, झोपडी कॅन्टीन ते गंगा उद्यान ते नवीन जिल्हाधिकारी कार्यालय रस्त्याचे काम, डीएसपी चौक ते पत्रकार चौक रस्ता या उपनगरातील प्रमुख रस्त्यांची कामे रखडली आहेत. या कामांना महापालिका प्रशासनाने गती द्यावी अशी मागणी होत आहे.




एकविरा चौक ते पारिजात चौक रस्त्याच्या रखडलेल्या कामाची नागरिकांच्या समवेत पाहणी करताना माजी नगरसेवक योगीराज गाडे.

### दीड वर्षापासून रखडला एकविरा चौक ते पारिजात चौक रस्ता

सावेडीतील एकविरा चौक ते पारिजात चौक तसेच पारिजात चौक ते बी.एस.एन.एल. ऑफिस मार्गे समतानगरपर्यंतच्या रस्त्याचे काम मागील दीड वर्षांपासून रखडलेले असून, आजतागायत पूर्ण झालेले नाही. या कामाचा वेग अत्यंत संथ असून, नागरिकांना व व्यापाऱ्यांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याची पाहणी नगरसेवक योगीराज गाडे व नागरिकांनी करत नाराजी व्यक्त केली.

रस्त्यावर सर्वत्र खड्डे, दगड व धुळीचे साम्राज्य आहे. वाहनधारक, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना मोठा त्रास होत आहे. वाहतुकीसाठी हा मार्ग अडथळ्यांचा बनला असून, नागरिकांना पर्यायी मार्गाने मोठा वळसा घ्यावा लागत आहे. परिणामी वेळ, इंधन आणि व्यवसाय तिन्हींचे नुकसान होत आहे. येथील व्यावसायिक तर रडकुंडीला आले आहेत. रस्ता खोदून ठेवलेला असल्याने त्यांच्या दुकानांमध्ये ग्राहकच येत नसल्याने त्यांचा व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला असून बँकांचे हप्ते कुठून भरायचे असा मोठा प्रश्न त्यांच्या समोर आ वासून उभा आहे. महापालिका सध्या प्रशासकांच्या ताब्यात असून, नागरिकांच्या कराच्या पैशातून सुरू असलेले हे काम वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण करणे ही त्यांची जबाबदारी आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनात निर्माण झालेला त्रास लक्षात घेऊन हे रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेवक योगिराज गाडे यांनी केली.

## नंदलाल कोठारी यांचे संथाराव्रतात निर्वाण



नगर – शोभानंद बंगला, धार्मिक परीक्षा बोर्ड जवळचे रहिवासी नंदलाल फुलचंद कोठारी (वय ७२) यांचे ४ नोव्हेंबर रोजी संथाराव्रतात निर्वाण झाले. ५ नोव्हेंबर रोजी त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. जैन कॉन्फरन्स, नवी दिल्ली व जैन वात्सल्य संस्थेचे ते पदाधिकारी तसेच प्रविणऋषीजी महाराज यांचे शिष्य होत.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगरचे मिरची व्यापारी अशोक कोठारी यांचे ते धाकटे बंधू, रितेश कोठारी यांचे वडील तर सुरज, धीरज, सचिन यांचे चुलते होत.

## भागुजी पानमळकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – नागरदेवळे येथील पानमळकर वस्तीतील रहिवासी भागुजी रामभाऊ पानमळकर (वय ९२) यांचे ४ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नागरदेवळे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भिंगार हायस्कुलचे माजी मुख्याध्यापक दत्तात्रय पानमळकर व मल्हारी, सुरेश पानमळकर यांचे ते वडील होत.

## भामाबाई कांबळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – अहिल्यानगर तालुक्यातील अरणगाव येथील भामाबाई माधव कांबळे (वय ९२) यांचे ४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अरणगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. यशवंत माधव कांबळे यांच्या मातोश्री, राधाकिसन, देवेंद्र, प्रेमानंद, अश्विन कांबळे यांच्या त्या आजी होत.

## सुंदरबाई पवार यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – आर्वी घाटरे, छोरियानगर येथील सुंदरबाई दगडू पवार (बायजा) (वय ६२) यांचे ४ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर ५ नोव्हेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीमती शोभा आजी रवंदळे यांची त्या मोठी बहीण तसेच विलास आणि अविनाश रवंदळे यांच्या त्या मावशी होत.

# अनुसूचित जातीतील युवक आणि युवतींसाठी विनामूल्य उद्योजकता प्रशिक्षणाचे आयोजन

### बार्टी व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचा उपक्रम; एक महिन्याचे मार्गदर्शनपर प्रशिक्षण



नगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक व युवतींसाठी एक महिन्याच्या कालावधीचे विनामूल्य उद्योजकता विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. बार्टीचे प्रकल्प अधिकारी सय्यद दिलावर, विभागीय अधिकारी आलोक मिश्रा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास आणि एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी रमेश जाधव यांनी सर्व पात्र युवक–युवतींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

प्रशिक्षणाचा शुभारंभ २० नोव्हेंबरला होणार असून समारोप १९ डिसेंबरला होईल. हा कार्यक्रम अहिल्यानगर जिल्हा उद्योग केंद्र परिसरातील शासकीय आयटीआय (MCED कार्यालयात) पार पडणार आहे. या प्रशिक्षणाचा उद्देश अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक–युवतींना स्वयंरोजगार आणि उद्योग व्यवसाय उभारणीसाठी सक्षम बनविणे हा आहे. प्रशिक्षणाद्वारे सहभागी उमेदवारांना उद्योग उभारणी, व्यवस्थापन, बाजारपेठेचे आकलन आणि वित्तीय नियोजन या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

प्रशिक्षणादरम्यान उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास व उद्योग निवड प्रक्रिया, उद्योग उभारणी आणि व्यवस्थापन पद्धती, बाजारपेठेचा अभ्यास व विक्री व्यवस्थापन, उद्योगाशी संबंधित कायदे आणि परवाने, उद्योग आधार नोंदणी, शासकीय योजना व कर्ज सुविधा, सिद्धी प्रेरणा प्रशिक्षण व प्रकल्प अहवाल तयार करणे, हिशोब पद्धती, उत्पादनाचे मूल्यनिर्धारण, डिजिटल मार्केटिंग व वित्तीय व्यवस्थापन या विषयावर अनुभवी उद्योजकांचे मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच प्रत्यक्ष उद्योगांना भेटी देखील दिल्या जाणार आहेत.

या प्रशिक्षणासाठी उमेदवार किमान आठवी उत्तीर्ण असावा व वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे इतकी आहे. प्रवेशासाठी जातीचे प्रमाणपत्र, आधारकार्ड व पॅनकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला किंवा गुणपत्रिका, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र या कागदपत्रासह इच्छुक उमेदवारांनी १८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत शनिराज प्रिंटिंग क्लस्टर, तपोवन रोड, अहिल्यानगर येथे उपस्थित राहण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्याच दिवशी मुलाखत घेऊन प्रशिक्षणार्थींची अंतिम निवड करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी आणि प्रवेश अर्जासाठी तेजस वैद्य (मो. नं. ७३७८८९३६७३) यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# सौर कृषी पंप देण्याच्या आमिषाने शेतकऱ्यांची फसवणूक

### ॲडव्हान्सपोटी २ लाख ६७ हजार गोळा करून सब डिलर झाला गायब

नगर – शासकीय योजनेतून सौर कृषी पंप मिळवून देण्याच्या नावाखाली राहुरी येथील एका सोलर कंपनीच्या सबडिलरने अनधिकृतपणे शेतकऱ्यांकडून प्रत्येक सुमारे १० हजार रुपयांपर्यंतच्या आगाऊ रकमा स्वीकारल्या. पैसे घेऊन १० महिन्यांचा कालावधी उलटला तरी देखील पंप बसवून न देता शेतकऱ्यांची सुमारे २ लाख ६७ हजार २०० रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना नगर तालुक्यातील खातगाव टाकळी येथे २४ जानेवारी २०२५ ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत घडली.

शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध व्हावी व वीज खर्चात बचत व्हावी यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांसाठी ९० ते ९५ टिक्के अनुदानावर सौर कृषी पंप योजना राबविली जात आहे. सौर पंप मिळण्यासाठी अर्ज ऑनलाईन केव्हा व कसा करायचा याबाबत माहिती होत नसल्याने अनेक शेतकरी गरज असुनही लाभापासून वंचित आहेत. अशा शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा उठवत राजेंद्र माधव बोऱ्हाडे (रा. आळेफाटा, ता.जुन्नर, जि.पुणे) याने खातगाव टाकळी येथील शेतकऱ्यांना आपण सोलर कंपनीचे सबडिलर असल्याचे सांगत सौर पंप मिळवून देण्याचे अमिष दाखवत जानेवारी २०२५ मध्ये गावांतील शेतकऱ्यांकडुन रोख रकमा उकळल्या मात्र त्यांना सौरपंप मिळाले नाही. त्याला फोन केला असता पुढील आठवड्यात सौर पंप बसवून देतो असे सांगत चालढकल केली. त्यानंतर काही शेतकऱ्यांनी त्याच्या बाबत अधिक माहिती घेतली असता त्याने राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचीही अशीच फसवणूक केली असल्याचे त्यांना समजले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर शेतकऱ्यांनी आरोपी राजेंद्र बोऱ्हाडे विरुद्ध पोलिस ठाण्यात फिर्याद देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ४ नोव्हेंबर रोजी माजी सैनिक विजय भानुदास जपे (वय ५२, रा. खातगाव टाकळी, ता.नगर) यांनी शेतकऱ्यांच्या वतीने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादी वरून पोलिसांनी राजेंद्र बोऱ्हाडे याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३१६ (२)(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## दारू साठी पैसे न दिल्याने रिक्षा चालकास मारहाण

नगर – दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने रिक्षा चालकास एकाने लाकडी बॅटने मारहाण केल्याची घटना शहरातील नालेगाव अमरधाम समोरील एका दुकानात ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास घडली.

याबाबत अनिल एकनाथ जेवुघाले (वय ५०, रा.अजिंक्य कॉलनी, भुषणनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून अजय लक्ष्मण वाडेकर (रा. शिवाजी नगर, केडगाव) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी वाडेकर याने फिर्यादीला दारू पिण्यासाठी पैसे मागितले. फिर्यादीने ते दिले नाहीत म्हणून त्याने जवळील दुकानात असलेली लाकडी बॅट घेवून फिर्यादी यांना बेदम मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

# जिल्हा न्यायालयातही वकीलांचे लालफिती लावून कामकाज



नगर – बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा यांचे निर्देशानुसार जिल्हा न्यायालय अहमदनगर येथे सर्व वकीलांनी लालफिती लावून कामकाज केले, अशी माहिती अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे यांनी दिली.

वकील संरक्षण कायदा मंजूर करावा म्हणून अहमदनगर जिल्ह्यातील सर्व बार असोसिएशनने शासनाकडे अनेक वेळा मागणी केली. लोकप्रतिनिधींनाही याकामी शासनाकडे पाठपुरावा केला परंतु वकील संरक्षण कायदा मंजूर झाला नाही. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही सर्व वकीलांनी ३ नोव्हेंबर रोजी लालफिती लावून कामकाज केले. शासनाने लवकरात लवकर वकील संरक्षण कायदा मंजूर न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा ॲड. राजेश कातोरे यांनी दिला.

यावेळी अहमदनगर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. वैभव आघाव, ॲड. सुरेश लगड, ॲड. लक्ष्मण कचरे, ॲड. प्रभाकर शहाणे, ॲड. रफीक बेग, ॲड. क्रुषणा झावरे, राजेश कावरे, ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. गौरव दांगट, ॲड. राजेंद्र शेलोत, ॲड. पंकज खराडे, ॲड. चंदन बारटक्के, ॲड. हरीश टेमकर, ॲड. भक्ती शिरसाठ, ॲड. आशा गोंधळी, ॲड. संदीप वांढेकर, ॲड. आनंद सुर्यवंशी, ॲड. विराज लगड, ॲड. रियाज बेग, ॲड. विजय गुंदेचा, ॲड. किशोर देशपांडे, ॲड. आयाज बेग, ॲड. अंकित प्रभणे, ॲड. शिवाजी कोतकर, ॲड. श्रीकांत वांढेकर, ॲड. संकेत तांबे, ॲड. तुषार जगताप, ॲड. अक्षय खाडे, ॲड. अंश डरांगे, ॲड. रोहित कदम, शिवाजीराव शेळके, ॲड. बहीरु जरे आदी वकील उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गुरु नानक देव

## मानवता आणि सामाजिक समतेचे प्रवर्तक

भारतीय संत परंपरेत अनेक थोर पुरुषांनी समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले, पण त्या परंपरेतील सर्वात तेजस्वी आणि मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे गुरु नानक देव होते. त्यांनी धर्माला पंथ, जाती, विधी यांच्यापलीकडे नेऊन तो समाजकल्याणाशी जोडला. त्यांच्या विचारसरणीत माणुसकी, समानता, सेवा, प्रेम, श्रमसन्मान आणि न्याय यांचे अद्भुत मिश्रण आहे. त्यांचे जीवन हे केवळ धार्मिक क्रांतीचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे घोषणापत्र ठरले. आजच्या काळातही त्यांची शिकवण समाजाला नवा नैतिक मार्ग दाखवते. गुरु नानक देव यांचा जन्म तळवंडी या गावात झाला, ज्याला आज ननकाना साहिब (पाकिस्तान) म्हणून ओळखले जाते. त्या काळात भारतीय समाज धर्माच्या नावाखाली विभागला गेला होता. जातिभेद, अंधश्रद्धा, स्त्रीदमन, शोषण आणि असमानता यांचे सावट संपूर्ण समाजावर पसरलेले होते. धर्म हा व्यवहाराच्या केंद्रस्थानी होता, पण त्याचा वापर लोकशोषणासाठी होत होता. अशा वेळी एका बालकाने समाजाला सांगितले की 'ना को हिंदू, ना को मुसलमान' म्हणजेच प्रत्येक मनुष्य सर्वप्रथम एक मानव आहे. हे वचन त्या काळातील धार्मिक संकुचिततेवर प्रहार करणारे आणि समाजाला नव्या दिशेने नेणारे होते.

गुरु नानक देव यांचे बालपण शांत, करुणामय आणि चिंतनशील वातावरणात गेले. लहानपणापासूनच त्यांना सामाजिक अन्याय, गरीबी, आणि धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार जाणवले. त्यांनी देवाला शोधण्याची प्रक्रिया बाह्य पूजापद्धतीत नव्हे, तर अंत:करणातील शुद्धतेत शोधली. त्यांनी धर्माला मनुष्याच्या आचरणाशी जोडले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे सत्याचा शोध, इतरांविषयी करुणा, प्रामाणिक श्रम आणि सामूहिक कल्याणासाठीची सेवा होय. त्यांची मूलभूत शिकवण तीन शब्दांत सांगता येते ते म्हणजेच नाम जपो, किरत करो आणि वंड छको. या तत्त्वांमध्ये समाजजीवनाची संपूर्ण दिशा अंतर्भूत आहे. नाम जपो म्हणजे सतत सत्य आणि परमात्म्याचे स्मरण, म्हणजेच अंत:करणातील शुद्धता; किरत करो म्हणजे प्रामाणिक श्रम करा, म्हणजेच जीवनात परिश्रम आणि स्वावलंबनाचा सन्मान करा; तर वंड छको म्हणजे आपल्या उत्पन्नातील काही भाग इतरांसोबत वाटून घ्या, म्हणजेच समाजातील दुर्बल घटकांविषयी जबाबदारी बाळगा. या शिकवणुकीत आर्थिक समता, सामाजिक न्याय आणि नैतिकतेचा सुंदर संगम दिसतो. हे तीन तत्त्व आजच्या समाजातही तितकेच उपयुक्त आहेत.

गुरु नानक देव यांनी समाजातील जातिभेदाचा तीव्र निषेध केला. त्यांच्या काळात समाजात 'उच्च' आणि 'नीच' यांच्यातील दरी फारच खोल होती. अस्पृश्यतेने माणसामाणसात भिंती उभ्या केल्या होत्या. पण त्यांनी शिकवले की 'सब मे जोत, जोत है सोई; तिस का चानण सब मे होई.' म्हणजे प्रत्येक जीवामध्ये त्या एकाच देवाची ज्योत आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव चुकीचा आहे. ही विचारसरणी सामाजिक समतेचे मूलतत्त्व ठरली. त्यांनी देवाच्या कृपेचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्य प्राणी मग तो कुणीही असो परमेश्वराचा अंश आहे. त्यांच्या कार्यातील सर्वात प्रभावी आणि क्रांतिकारी कल्पना म्हणजे 'लंगर' होय. सामूहिक भोजनाची परंपरा, लंगरात सर्व धर्म, जाती, स्त्री–पुरुष एकत्र बसून एकसमान पद्धतीने जेवतात. लंगर हे केवळ अन्नदान नाही, तर सामाजिक समतेचे सशक्त प्रतीक आहे. या उपक्रमातून त्यांनी उच्चनीचतेची भिंत पाडली आणि सामाजिक ऐक्य निर्माण केले. आजही जगभरातील गुरुद्वारांमध्ये चालणारा लंगर हा मानवतेचा, सेवाभावाचा आणि समतेचा जिवंत वारसा आहे.

गुरु नानक देव यांनी धर्माच्या नावाखाली होणाऱ्या ढोंगीपणाला व पाखंडाला आव्हान दिले. त्या काळातील धार्मिक नेते लोकांना देवाची भीती दाखवून त्यांच्या श्रमावर जगत होते. त्यांनी स्पष्ट सांगितले की, देवाला प्रसन्न करण्यासाठी दान, यज्ञ, हवन, आडंबराची आवश्यकता नाही; खरा धर्म म्हणजे प्रामाणिक आचरण, करुणा, आणि सत्याशी निष्ठा होय. त्यांनी धर्माचा अर्थ पुन्हा परिभाषित केला. 'धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा बंध आहे, विभाजक नव्हे.' त्यांनी धर्माला सामाजिक नैतिकतेचा पाया बनवला. गुरु नानक देव हे स्त्रीसमानतेचेही प्रवर्तक होते. त्या काळात स्त्रियांना समाजात कनिष्ठ स्थान होते. पण त्यांनी ठामपणे सांगितले की 'सो क्यों मंदा आखिए, जित जमे राजान.' म्हणजे जी स्त्री राजांना जन्म देते, ती कशी कनिष्ठ असू शकते? त्यांनी स्त्रियांना समाजातील समान स्थान देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांच्या विचारांमुळे पुढे शीख धर्मात स्त्रियांना धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मान्यता मिळाली. हे त्या काळातील समाजासाठी अत्यंत प्रगतिशील विचार होते. त्यांनी 'सेवा' या तत्त्वावर आधारलेली एक संस्कृती निर्माण केली. त्यांच्या मते, 'ईश्वराची सेवा म्हणजे मनुष्य प्राण्याची सेवा होय. त्यांनी गरीब, वंचित, पीडित यांच्यासाठी कार्य करणे हेच धर्माचे खरे सार मानले. त्यांनी सांगितले की, समाजातील दुःख कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या सामर्थ्याने योगदान दिले पाहिजे. या सेवाभावातूनच शीख धर्मातील 'सेवा' आणि 'संगत' या दोन संकल्पना निर्माण झाल्या. संगत म्हणजे सामूहिक प्रार्थना आणि सहजीवनाचा भाव, तर सेवा म्हणजे निःस्वार्थपणे कार्य करणे. या दोन्ही कल्पनांनी समाजात बंधुभाव आणि सहकार्याचे वातावरण निर्माण केले.

गुरु नानक देव यांनी समाजात श्रमाचा सन्मान वाढवला. त्यांनी सांगितले की 'घाळ खाए किछ हातहु दे, नानक राहु पछाणे से.' म्हणजे जो स्वतः परिश्रम करतो आणि इतरांना देतो, तोच योग्य मार्ग ओळखतो. त्या काळात श्रम करणाऱ्यांना समाजात नीच मानले जात होते, पण त्यांनी सांगितले की श्रम म्हणजेच साधना. या विचारांनी श्रमिक वर्गाला आत्मसन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठा दिली. त्यांनी समाजाला शिकवले की परिश्रमाशिवाय अध्यात्म शक्य नाही. गुरु नानक देव यांनी आपल्या जीवनात चार प्रमुख प्रवास केले. भारताच्या विविध भागांपासून ते अरब, तिबेट, श्रीलंका, चीनपर्यंत. या प्रवासांमध्ये त्यांनी विविध धर्म, पंथ, आणि संस्कृतींच्या लोकांशी संवाद साधला. त्यांनी सर्व धर्मांच्या श्रेष्ठ तत्त्वांना मान्यता दिली आणि सर्वांमध्ये एकतेचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की सत्य आणि प्रेम हाच प्रत्येक धर्माचा मूळ गाभा आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये सर्वधर्मसमभावाचे अधिष्ठान आहे. त्यांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर, ते 'समावेशक समाजरचना' (inclusive society) निर्माण करण्याचा आराखडा होते. त्यांनी सांगितले की समाज हे धर्म, जात, लिंग या आधारांवर नव्हे, तर समानता, सहकार्य, आणि न्याय या मूल्यांवर उभे राहिले पाहिजे. त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या नैतिक जबाबदाऱ्या अधोरेखित केल्या. त्यांनी धर्म आणि समाज यांचा मेळ घालून एक सामाजिक चळवळ निर्माण केली. त्यांच्या शिकवणीत आर्थिक न्याय या संकल्पनेलाही महत्त्व आहे. त्यांनी श्रीमंत–गरीब यांच्यातील विषमता नाकारली आणि 'वंड छको' या तत्त्वाद्वारे संपत्तीचे समान वाटप करण्याचा संदेश दिला. त्यांनी लोभ, स्वार्थ आणि शोषणाला पाप ठरवले. त्यांच्या विचारांमध्ये सामूहिक समृद्धीची कल्पना आहे. आजच्या काळातील 'सामाजिक समता' आणि 'आर्थिक न्याय' या संकल्पना त्यांच्या शिकवणीशी पूर्णपणे सुसंगत दिसतात.

गुरु नानक देव यांची समाजदृष्टी सर्वसमावेशक, वैज्ञानिक आणि आधुनिक होती. त्यांनी शिक्षण, आत्मविकास, सत्यशोधन आणि सामाजिक जबाबदारी यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणीय समतोलाचाही गाभा आहे. त्यांनी सांगितले की 'हवा गुरु, पाणी पिता, माता धरत महत.' म्हणजे निसर्गातील प्रत्येक घटक आपला नातेवाईक आहे. त्यामुळे निसर्गाचा सन्मान करणे हेही धर्माचेच रूप आहे. आजच्या युगात, जेव्हा समाजात असहिष्णुता, भेदभाव, धार्मिक दुरावा आणि नैतिक अध:पतन वाढले आहे, तेव्हा गुरु नानक देव यांचे तत्त्वज्ञान अधिकच अर्थपूर्ण वाटते. त्यांनी दाखवलेला मार्ग केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक पुनर्जागरणाचा आहे. त्यांनी माणसामाणसात प्रेम आणि सहकार्याची भावना निर्माण केली. त्यांनी सांगितले की समाजाचा खरा विकास तेव्हाच शक्य आहे, जेव्हा प्रत्येक व्यक्ती इतरांसाठी जगते आणि इतरांच्या हितासाठी कार्य करते. गुरु नानक देव जयंती म्हणजे केवळ धार्मिक सण नाही, तर मानवतेच्या पुनरुज्जीवनाचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, धर्माचा सार माणसाच्या कल्याणात आहे, विधी–विधानात नव्हे. त्यांनी दिलेले 'नाम, किरत, वंड' हे त्रिसूत्र आजही समाजजीवनाचे दिशा–तत्त्व ठरू शकते. त्यांनी शिकवले की समाजात एकमेकांविषयी आदर, प्रेम, समानता आणि करुणा हीच खरी ईश्वरभक्ती आहे.

शेवटी असे म्हणता येईल की गुरु नानक देव हे केवळ शीख धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते मानवतेचे जागतिक प्रवक्ते होते. त्यांनी दाखवलेला मार्ग कालातीत आहे, जो प्रत्येक माणसाला स्वतःच्या अंत:करणाशी जोडतो आणि समाजाशी नाते घट्ट करतो. त्यांचे विचार आजही समाजाच्या आत्म्याला नवी ऊर्जा देतात. त्यांच्या शिकवणुकीचा अर्थ असा की, माणूस हेच देवाचे सर्वश्रेष्ठ रूप आहे. म्हणूनच गुरु नानक देव जयंती साजरी करणे म्हणजे त्यांच्या तत्त्वांचा अंगीकार करून समाजात प्रेम, समानता आणि सेवा या मूल्यांचा पुनःप्रकाश प्रज्वलित करणे होय.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# श्री गुरु नानक देवजी मानवतेचे दीपस्तंभ

श्री गुरु नानक देवजी, शीख धर्माचे संस्थापक, यांचा जन्म कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी इ.स. १४६९ मध्ये तल्वंडी गावात (आताचे ननकाना साहिब, पाकिस्तान), लाहोरपासून सुमारे ६५ किमी अंतरावर झाला. त्यांच्या वडिलांचे कार्य महसूल प्रशासनात होते. बालपणी गुरु नानकजींनी स्थानिक भाषा, पर्शियन व अरबीचे शिक्षण घेतले. त्यांचा विवाह इ.स. १४८७ मध्ये झाला व दोन सुपुत्र – १४९१ आणि १४९६ मध्ये जन्मले.

नंतर सुलतानपूर येथे मेहुण्याच्या आग्रहाने त्यांनी दौलत खान लोधी यांच्या किराणा दुकानात नोकरी स्वीकारली. एके दिवशी '१३' आकडा येताच त्यांनी सब तेरा, तेरा म्हणत सर्व माल लोकांना विनामूल्य वाटला. याच घटनेतून 'तेरा' (१३) हा अंक शीख समाजात शुभ मानला जातो. सुलतानपूरमध्येच त्यांची भेट भाई मर्दाना – एक मुस्लिम भाट व शाहीर – यांच्याशी झाली, जे पुढे त्यांच्या धर्मप्रचार यात्रांमध्ये सदैव सोबत होते.

बालपणी वडिलांनी दिलेल्या २० रुपयांत त्यांनी गरीब व संतांसाठी अन्न खरेदी करून वाटले. वडिलांनी विचारले, व्यवसाय कुठे केला? तेव्हा गुरुजी म्हणाले, मी 'सच्चा सौदा' केला – म्हणजेच खरी देवसेवा केली. आज त्या ठिकाणी 'गुरुद्वारा सच्खंड सच्खा सौदा' आहे.

इ.स. १४९६ मध्ये त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला आणि त्यांचे पहिले वचन होते –ना को हिंदू, ना मुसलमान.

त्यांचा संदेश होता – मानव एक आहे, देव एक आहे. त्यांनी भाई मर्दाना यांच्यासह भारतभर व आसपासच्या प्रदेशांत पाच दीर्घ यात्रांद्वारे धर्मप्रचार केला. त्या काळी प्रवास धोकादायक होता, तरी त्यांनी सर्व धर्म, प्रांत व संस्कृतींच्या ठिकाणांना भेट दिली.

एका यात्रेत ते भाई लालो, गरीब सुतार, यांच्या घरी राहिले. मलिक भागो या श्रीमंत जमीनदाराने आमंत्रण दिले, परंतु गुरुजींनी नाकारले. भागो रागावला तेव्हा गुरुजींनी लालोच्या चपाती व भागोच्या मेव्याचे अन्न हातात दाबले. लालोच्या चपातीमधून दूध, तर भागोच्या अन्नातून रक्त निघाले –

प्रामाणिक श्रमाने मिळवलेले अन्नच शुद्ध असते, हा संदेश आजही शीख धर्माचा मूलभूत नैतिक आधार आहे.

हरिद्वार येथे त्यांनी लोकांना पूर्वेकडे गंगा अर्पण करताना पाहिले व स्वतः पश्चिमेकडे (पंजाबकडे) पाणी फेकले. लोकांनी विचारले तेव्हा गुरुजी म्हणाले, जर तुमचे पाणी स्वर्गात पोहोचू शकते, तर माझे पाणी माझ्या शेतात का नाही?

या माध्यमातून त्यांनी अंधश्रद्धेविरुद्ध तर्क आणि विवेकाचा संदेश दिला.

गुरु नानक देवजींनी आयुष्याची २५ वर्षे धर्मप्रचार यात्रांमध्ये घालवली. त्यांच्या अनेक भजनांनी समाजातील अन्याय, अंधश्रद्धा, जातिवाद व भेदभावाविरोधात जागृती केली. त्यांनी सर्व धर्मांचा अभ्यास केला व सर्वत्र एक करतार – एक देव या तत्वाचा प्रचार केला. त्यांनी रूढी, कर्मकांड आणि खोट्या आचारांना नाकारले.

यात्रेनंतर ते करतारपूर (पंजाब पाकिस्तान) येथे स्थायिक झाले आणि शेतकऱ्याचे रूप धारण केले. सकाळी जपजी साहिब व संध्याकाळी सोदर आरती या पद्धतीने उपासना करत. त्यांनी समाजाला 'कीरत करो, नाम जपो, वंड छको' – म्हणजेच प्रामाणिक श्रम करा, ईश्वराचे स्मरण करा आणि इतरांबरोबर वाटून खा – हे जीवनमंत्र दिले.

त्या काळी प्रत्येक शीख घरात धरमशाळा होती जिथे प्रवाशांना अन्न मिळे; ही परंपरा आजच्या लंगर सेवेत पुढे चालू आहे. अलीकडच्या काळात काश्मीरमधील पूर, केरळमधील आपत्ती, रोहिंग्या निर्वासितांची स्थिती, कोरोना काळात– अशा सर्व प्रसंगी शीख समाजाने निस्वार्थ सेवा आणि लंगर परंपरा जपली आहे.

गुरु नानक देवजींनी आपल्या उपदेशांमध्ये स्पष्ट सांगितले – ओ लालो, प्रभूचे शब्द मला येतात, म्हणून मी त्यांना व्यक्त करतो.

त्यांनी भजन–शब्दांद्वारे सत्य, समता आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या अनुयायांना सत् नाम, करतार या शब्दांनी अभिवादन करण्याची प्रथा सुरू झाली.

गुरुजींनी शेवटी भाई लहणा यांना आपला उत्तराधिकारी म्हणून नेमून त्यांना 'गुरु अंगद' हे नाव दिले. त्यांनी आपल्या पुत्रांना गुरगदी न देता, गुण व त्यागावर आधारित प्रणाली स्थापन केली.

गुरु नानक देवजींनी एका नवीन आध्यात्मिक युगाची पायाभरणी केली – जिथे मानवतेला धर्मापेक्षा वरचं स्थान दिलं गेलं. त्यांचे उपदेश आजही कालातीत आहेत आणि सर्वांना सत्य, परिश्रम व सेवा यांचा संदेश देतात.

५ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री गुरु नानक देवजींची ५५६ वी जयंती साजरी केली जाणार आहे. या पवित्र दिवशी सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

एक ओंकार सतनाम करतार पुरख निरभउ निरवैर

**– हरजीत सिंग वधवा, मो. ९४२३१६२७२७**

# गुरुनानक देवजी जयंती निमित्त तारकपूरमध्ये प्रभात फेरी

## गुरुनानकांच्या जयघोषाने दुमदुमले परिसर; भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथे विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात; आहुजा परिवाराच्या वतीने प्रभात फेरीतील भाविकांचे स्वागत

नगर – जो बोले सो निहाल, सत श्री अकाल... चा जयघोष, अखंडपाठ, किर्तन व प्रवचनांच्या भक्तीमय वातावरणात शहरात गुरुनानक देवजी यांची ५५६ वी जयंती म्हणजेच गुरुपुरब उत्साहात साजरा करण्यात आला. ५ नोव्हेंबर रोजी सकाळी तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथून शीख, पंजाबी व सिंधी समाजाच्या वतीने पारंपारिक वाद्यासह प्रभातफेरी काढण्यात आली होती. यामध्ये समाजबांधव व महिलांनी सहभागी होऊन गुरुनानक देवजी यांचा जयघोष केला.

तारकपूर परिसरातून निघालेल्या या प्रभातफेरीचे टॉपअप पेट्रोल पंप येथे जनक आहुजा परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. फेरीमध्ये वाहनावर असलेल्या गुरुनानक देवजी यांची प्रतिमा व धार्मिक पोथीवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तर गुरुनानक देवजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांनी सामुदायिक अरदास (प्रार्थना) करुन सुख, समृध्दी व शांततेसाठी प्रार्थना केली.





गुरुनानक देवजी जयंती निमित्त तारकपूर परिसरातून प्रभातफेरीचे टॉपअप पेट्रोल पंप येथे जनक आहुजा परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. फेरीमध्ये वाहनावर असलेल्या गुरुनानक देवजी यांची प्रतिमा व धार्मिक पोथीवर फुलांचा वर्षाव करण्यात आला.

याप्रसंगी जनक आहुजा, इंद्रजीत नय्यर, हरजीतसिंग वधवा, राजेंद्र कंत्रोड, प्रीतपालसिंग धुप्पड, गुलशन कंत्रोड, राजीव बिंद्रा, अनिश आहुजा, जतीन आहुजा, अभिमन्यू नय्यर, ब्रिजमोहन कंत्रोड, अमित खामकर, बबलू आहुजा, कैलाश नवलानी, जितू गंभीर, अमित खामकर, सोमनाथ जाधव, निप्पू धुप्पड, राजू जग्गी, सुनील थोरात, अनमोल रामानी, किशोर कंत्रोड, अनिल शर्मा, संजय आहुजा, जशपाल पंजाबी, रिकी कंत्रोड, दिनेश कंत्रोड, मनमोहन चोपडा, सतीश गंभीर आदींसह समाजबांधव व महिला उपस्थित होत्या.

गुरुनानक जयंतीनिमित्त मागील सात दिवसापासून शहरातील व तारकपूर येथील गुरुद्वारा येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कीर्तन दरबार, प्रवचन, अखंडपाठ, सांस्कृतिक कार्यक्रमासह लंगरचा भाविकांनी लाभ घेतला. रागी जथ्था भाई अम्रितसिंगजी (इंदोरवाले) यांनी किर्तन सादर केले. तर प्रवचनाच्या माध्यमातून गुरूनानक देवजी यांचे संदेश व विचार समाज बांधवांना सांगण्यात आले.



पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य मंगेश जगताप यांना 'बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड'ने सन्मानित करताना किरण बेदी. समवेत आंतरराष्ट्रीय खेळाडू साईना नेहवाल आदी.

# अहिल्यानगरच्या पोदार इंटरनॅशनल स्कूलचे मंगेश जगताप यांना 'बेस्ट प्रिन्सिपल अॅवॉर्ड'

नगर – पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगर या शिक्षण संस्थेचे प्राचार्य मंगेश जगताप यांना मुंबई येथे आयोजित 'इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड एक्सलन्स अवॉर्डस् २०२५' या समारंभात 'बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड' ने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार भारताच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी किरण बेदी आणि बॅडमिंटनपटू सायना नेहवाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

प्राचार्य मंगेश जगताप हे गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, आधुनिक शिक्षणपद्धतींचा अवलंब, मूल्याधिष्ठित शिक्षण व नवोन्मेषी उपक्रम राबविण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरने शैक्षणिक निकालात, स्पर्धात्मक परीक्षांमध्ये तसेच सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातही यश मिळवले आहे. शैक्षणिक क्षेत्रात नावीन्य आणण्याच्या दृष्टीने त्यांनी 'स्टुडंट सेंटरड एज्युकेशन', डिजिटल क्लासरूम, स्किल–बेस्ड अॅक्टिव्हिटीज् आणि जागतिक दर्जाच्या अध्यापन पद्धतींची अंमलबजावणी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त करत आहेत.

# उच्च प्रतीच्या सेवा देण्यात साईदीप सह्याद्री हॉस्पिटल अग्रेसर

## डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन; रोबोटिक यंत्राचे लोकार्पण

नगर – नगर जिल्ह्यात उच्च प्रतीच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यामध्ये साईदीप सह्याद्री हॉस्पिटल नेहमीच अग्रेसर असते नवनवीन तंत्रज्ञान व अचूक उपचार यामुळे अल्पावधीत साईदीप सह्याद्री हॉस्पिटल ने नावलौकिक मिळवले आहे, असे प्रतिपादन विखे पाटील फाउंडेशन चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

हॉस्पिटलमध्ये गुडघ्याच्या व खुब्याचे जॉइंट रिप्लेसमेंट करण्यासाठी नव्याने समाविष्ट केलेल्या रोबोटिक यंत्राचे लोकार्पण समारंभात डॉ. सुजय विखे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे व प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्राम जगताप उपस्थित होते. हॉस्पिटल चे चेअरमन डॉ. दीपक एस एस, डॉ. सुनील राव, डॉ. आर आर धूत, डॉ. निसार शेख, डॉ. व्ही एन देशपांडे, डॉ. कैलास झालानी, डॉ. श्यामसुंदर केकडे, डॉ. हरमीत कथुरिया, सौ. ज्योती दीपक, डॉ. किरण दीपक, डॉ. वैशाली किरण, डॉ. एस एम इक्बाल, डॉ. अभिजित नालकर, डॉ. भूषण खर्चे, कर्नल एस रवी, डॉ. अश्विन झालानी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करून डॉ. सुजय विखे, आमदार संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे व सर्वांच्या हस्ते रोबोटिक यंत्राचे लोकार्पण करण्यात आले.

रोबोटिक यंत्राच्या साहाय्याने गुडघ्याचे व खुब्याचे जॉइंट रिप्लेसमेंट सर्जरी बाबत माहिती देताना डॉ. व्ही एन देशपांडे यांनी या यंत्रामुळे अचूक मोजमाप घेऊन इंप्लांट बसवणे खूप सोपे होते यामुळे ऑपरेशन पश्चायात रुग्णास लवकर आराम मिळतो.

यावेळी डॉ. अभिजित नालकर यांनी रोबोटिक यंत्रच्या साहाय्याने इंप्लांट करताना सर्जन यांना रुग्णांच्या पायाची उंची, व रुग्ण चालताना कोणताही त्रास होणार नाही याप्रमाणे अचूक पद्धतीने इंप्लांट केले जाते.



साईदीप सह्याद्री हॉस्पिटलमध्ये रोबोटिक यंत्राचे लोकार्पण करताना डॉ. सुजय विखे पाटील. समवेत आ. संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे, डॉ. दीपक आदी.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. दीपक यांनी साईदीप हॉस्पिटलची निर्मितीपासून ते साईदीप सहयाद्री हॉस्पिटल होई पर्यंत अनेक अडचणी वर मात करून केवळ रुग्ण आणि त्यांच्यावरील वैद्यकीय उपचार हे केंद्र बिंदू ठेवून प्रवास सुरु आहे. रोबोटीक युनिट केले आहे, विदेशातील व मोठ्या महानगरातील अनेक वैद्यकीय व्यवसयाचे प्रस्ताव असताना देखील मी आणि माझे सहकारी संचालक व त्यांचे डॉक्टर मुले यांनी नगरच्या मातीतच आपल्याला वैद्यकीय सेवा द्यायच्या आहेत म्हणून साईदीप ची निर्मिती केली असे म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे यांनी डॉ. दीपक एस एस व त्यांचे सर्व वैद्यकीय सहकारी डॉक्टर संचालक यांनी हॉस्पिटल मध्ये नगर सारख्या ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून उच्च व दर्जेदार प्रतीच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या. यामध्ये सामान्य रुग्णांसाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना तथा आयुष्यमान भारत पंतप्रधान योजना, माजी सैनिकांसाठी वैद्यकीय सेवा इत्यादी समाविष्ट असून या द्वारे सेवेचे व्रत घेऊन जे एक रोपटे लावले होते त्याचे रूपांतर आता वृक्षांमध्ये होत आहे. हॉस्पिटल ने अल्पावधीत योग्य निदान व अचूक उपचार हे तंत्र वापरून नावलौकिक मिळवले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान समाविष्ट असलेले रोबोटिक यंत्र यामुळे गुडघ्याचे व खुब्याचे जॉइंट रिप्लेसमेंट ऑपरेशन अचूक पद्धतीने करता येऊन रुग्णास दैनंदिन कामकाज करण्यासाठी हॉस्पिटल मधून लवकर डिस्चार्ज होऊन पूर्ववत होता येईल.

प्रमुख पाहुणे आमदार संग्राम जगताप यांनी डॉ. दीपक व त्यांचे सहकारी यांनी दूरदृष्टी ठेवून शहर उपनगर नगर जिल्हा तसेच आसपासच्या जिल्ह्यातील रुग्णांसाठी उपलब्ध केलेल्या अत्याधुनिक सेवा यामुळे हॉस्पिटल ने मोठे नाव स्थापित केले आहे. कोविड काळात अनेक वेळा विविध रुग्णांनासाठी मी ज्या वेळी हॉस्पिटलला भेट देत होतो त्यावेळी लांब अंतराहून रुग्ण येथे उपचार घेण्यासाठी आलेले आणि बरे होऊन घरी गेलेले पहिले, मुद्दामहुन सांगावसे वाटते की सर्वांत महत्वाचे आहे. डॉ. दीपक व त्यांचे सहकारी डॉक्टर्स यांनी आधुनिक तंत्रज्ञान डोळ्या समोर ठेऊन उपयोगात आणले आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वैद्यकीय सेवा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध केल्या, अतिशय स्वच्छ व सुंदर रुग्णालय आहे आणि तेवढेच वैद्यकीय सेवा देण्यात तत्पर सुद्धा आहे. नगर चे रूप बदलते शहर, सर्व उपनगरे येथील नवीन काँक्रेट रस्ते रास्ते होताहेत शहर व आपल्या आसपास चा परिसर स्वच्छ ठेवणे हे देखील प्रत्येक नागरिकाने कर्तव्य पार पाडले पाहिजे. सूत्रसंचालन डॉ. संगीता कुलकर्णी व डॉ. पायल धूत यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. कैलास झालानी यांनी केले. कार्यक्रमास शहरातील उद्योजक, व्यापारी, रुग्ण व नातेवाईक व नागरिक आणि हॉस्पिटलचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# भलतीच भाषा बोलणारं गाव

हिमाचल प्रदेशमधलं एक गाव खूपच अनोखं आहे. इथले लोक वेगळ्याच भाषेत बोलतात. मलाणा असं या गावाचं नाव आहे. हिमालयात वसलेल्या या गावाच्या चारही बाजूंना खोल दऱ्या आणि बर्फाच्छादित शिखरं आहेत. या गावात १७०० लोक राहतात. हे गाव पर्यटकांमध्ये बरंच लोकप्रिय आहे. मलाणापर्यंत पोहोचणं सोपं नाही. इथे जाण्यासाठी सरळ रस्ता नाही. डोंगरदऱ्यांमधून वाट काढत जावं लागतं. पार्वती खोऱ्याच्या तळाशी असणाऱ्या जरी नावाच्या गावातून मलाणाला जाता येतं. जरीहून मलाणाला जाण्यासाठी चार तास लागतात.

इथले लोक स्वत:ला सिकंदराचे वंशज मानतात. जग जिंकण्यासाठी निघालेल्या सिकंदराने भारतावर हल्ला केला होता. त्यावेळी त्याचे काही सैनिक या गावात आले होते. त्यानंतर हे सैनिक इथून गेलेच नाहीत. ते इकडचेच झाले. आपण सिकंदराच्या याच सैनिकांचे वंशज आहोत, असं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. पण अद्याप हे पूर्णपणे सिद्ध झालेलं नाही. सिकंदराच्या काळातल्या काही वस्तू या गावात सापडल्या आहेत. सिकंदराच्या काळातली एक तलवार याच गावातल्या एका मंदिरात असल्याचं बोललं जातं. इथले लोक कनाशी नामक भाषा बोलतात. ही भाषा जगातल्या कोणत्याही भागात बोलली जात नाही. या भाषेच्या उत्पत्तीबाबत संशोधन सुरू आहे. ही भाषा बाहेरच्या लोकांना शिकवली जात नाही. इथले लोक जमलू नामक देवतेची पूजा करतात. ही जमलू देवता म्हणजे जमदग्नी ऋषी. इथे जमलू देवता आणि त्यांची पत्नी रेणुकेचं मंदिरही आहे.

# कॅलिडोस्कोप

# 'माता ना मढ'मध्ये मंगळासारखं वातावरण

मंगळ ग्रहाबद्दल मानवाला प्रचंड आकर्षण आहे. म्हणूनच मंगळाच्या पृष्ठभागावर बरंच संशोधन केलं जात आहे. नासा या अमेरिकेच्या अवकाश संशोधन संस्थेसह इस्रोनेही मंगळावर यान धाडलं.

मंगळावर संशोधन सुरू आहेच. पण आता आपल्या पृथ्वीवर मंगळाच्या पृष्ठभागासारखं वातावरण असणारी जागा सापडली आहे. ही जागा आपल्या भारतात आहे. गुजरातमधल्या कच्छ परिसरातल्या 'माता ना मढ' इथे मंगळाच्या पृष्ठभागासदृश जागा आढळली आहे. यामुळे बऱ्याच शास्त्रज्ञांनी इथे धाव घेतली आहे. मंगळाशी साधर्म्य साधणारं हे जगातलं एकमेव ठिकाण असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. इस्रो, आयआयटी खरगपूर आणि हैदराबाद इथलं जियोफिजिकल रिसर्च सेंटर या भागात एकत्रितपणे संशोधन करणार आहे. माता न मढचा अभ्यास खगोलशास्त्रज्ञांसाठी बराच उपयुक्त ठरणार असल्याचं मत आयआयटी खरगपूरच्या भूविज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. साईबल गुप्ता यांनी व्यक्त केलं आहे. यामुळे नासा आणि इस्रोला मंगळ यान मोहिमेदरम्यान यान उतरवण्याचं ठिकाण निश्चित करणं सोपं जाईल, असं त्यांचं म्हणणं आहे. माता न मढची दखल अमेरिकन शास्त्रज्ञांनीही घेतली आहे. इथल्या वॉशिंग्टन विद्यापीठातले शास्त्रज्ञ अधिक संशोधन करण्यासाठी भारतात दाखल झाले आहेत. इथल्या जमिनीत जॅरोसाईट हा घटक आढळला आहे. जॅरोसाईट मंगळाच्या पृष्ठभागावर सापडतो. म्हणूनच मंगळ ग्रहावरच्या वातावरणाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने या जागेचं संशोधन उपयुक्त ठरणार आहे. मंगळ ग्रहावरच्या पाण्याच्या अस्तित्वाचाही यानिमित्ताने आढावा घेता येणार आहे.



# आलिशान गाड्यांपेक्षाही महाग पशूधन!

राजस्थानातील पुष्कर येथील प्राण्यांचा बाजार देशभरामध्ये चर्चेत आहे तो येथील दोन प्राण्यांमुळे! भारतभरात या कृषी मेळ्याची चर्चा रंगली आहे ती एक घोडा आणि एका म्हैसीमुळे! एखाद्या बीएमडब्ल्यू, मर्सिडीज गाडीलाही लाजवेल इतकी या घोड्याची आणि म्हशीची किंमत आहे. ६५ लाखांच्या टेस्लाचा विचार केला तर अशा ३५ टेस्ला विकत घेता येतील एवढी महाग ही म्हैस असून घोड्याची किंमत इतकी आहे, की त्यामध्ये २३ टेस्ला विकत घेता येतील.

देशातील सर्वांत प्रसिद्ध पशुधन मेळाव्यांपैकी एक अशी ओळख असलेल्या हा पशुमेळा ऑक्टोबरपासून नोव्हेंबरपर्यंत चालतो. देशभरातील पशुपालक आणि पशुधनप्रेमी नागरिक पहिल्या दिवसापासून गर्दी करतात. मेळाव्यासाठी आतापर्यंत चार हजार ३०० हून अधिक जनावरांची नोंदणी झाली असून, त्यात तीन हजार २८ घोडे आणि एक हजार ३०६ उंटांचा समावेश आहे; मात्र सर्वांत जास्त लक्ष वेधून घेतो आहे दोन वर्षे सहा महिन्यांचा शाहबाज नावाचा घोडा. तो चंडीगड





येथील गॅरी गिल यांच्या मालकीचा आहे. या घोड्याची किंमत थक्क करणारी आहे.

हा घोडा तब्बल १५ कोटी रुपये किंमतीचा असून त्याहूनही महाग म्हणजेच २३ कोटी रुपयांची म्हैस आहे. शाहबाज घोड्याने अनेक स्पर्धा जिंकल्या आहेत आणि तो प्रतिष्ठित वंशाचा आहे. त्याची विक्री किंमत १५ कोटी रुपये असल्याचे स्वत: गिल यांनी सांगितले. आजवर या मारवाडी जातीच्या घोड्यासाठी त्यांना नऊ कोटी रुपयांचा प्रस्ताव आला आहे. या मेळाव्यातील दुसरे आकर्षण म्हणजे दीडशे किलो वजनाची 'अनमोल' नावाची म्हैस. हिची किंमत तब्बल २३ कोटी रुपये आहे. तिचे मालक पार्मिंद्र गिल यांनी सांगितले, की या म्हशीला राजेशाही थाटात वाढवले आहे. तिला रोज दूध, देशी तूप आणि सुका मेवा दिला जातो.

उज्जैन येथील आणखी एक म्हैस 'राणा' हीसुद्धा विशेष चर्चेत आहे. तिचे वजन ६०० किलो असून किंमत २५ लाख रुपये आहे. तिला रोज दीड हजार रुपयांचा खुराक दिला जातो. ज्यात बेसन, अंडी, तेल, दूध, तूप आणि लिव्हर टॉनिकचा समावेश आहे. मेळाव्यातील अजून एक आकर्षण म्हणजे 'बादल' नावाचा मारवाडी प्रजातीचा घोडा. हा तब्बल २८५ पिल्लांचा बाप आहे. त्याची किंमत ११ कोटी असल्याचे सांगण्यात आले; परंतु तो अद्याप विकला गेला नाही. केवळ १६ इंच उंचीची गाय ही येथील प्रमुख आकर्षण ठरत आहेत.



# स्कुटर खरेदीसाठी आणली गोणीतून नाणी!

छत्तीसगडमधील जशपूर जिल्ह्यातील एका शेतकरी कुटुंबाने कठोर परिश्रम आणि समर्पणाचे दर्शन घडवले. हे कुटुंब सहा महिन्यांच्या मेहनतीतून कमवलेले पैसे घेऊन नवीन स्कूटर खरेदी करण्यासाठी जिल्हा मुख्यालयातील देवनारायण होंडा शोरूममध्ये पोहोचले. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ४० हजार रुपयांपैकी बहुतेक १० आणि २० रुपयांची नाणी होती. ही नाणी एका छोट्या पोत्यामध्ये आणली होती. शोरूमच्या कर्मचाऱ्यांना ती मोजण्यासाठी जवळपास दोन तासापेक्षा जास्त वेळ लागला; परंतु हे दृश्य सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले.

या शेतकऱ्याचे नाव रामलाल यादव आहे. तो जशपूरजवळील बसंतपूर या लहानशा गावाचा रहिवासी आहे. रामलाल यांनी सांगितले, की आमचे कुटुंब शेतीवर अवलंबून होते. माझ्या मुलीच्या लग्नानंतर, आता माझ्या मुलाला त्याच्या अभ्यासासाठी स्कूटरची गरज होती. गेल्या सहा महिन्यांपासून आम्ही प्रत्येकाने काम आणि कठोर परिश्रम केले. भाजीपाला विकला, मजूर म्हणून काम केले. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने योगदान दिले. आमच्याकडे नोटा नव्हत्या. ४० हजार रुपयांची नाणी आणि उरलेल्या नोटा घेऊन शोरूममध्ये पोहोचलो.

रामलाल त्यांची पत्नी सुनीता, मुलगा अजय आणि मुलगी राणीसह शोरूममध्ये दाखल झाले. सोबत आणलेले पोते उघडताच शोरूममधील सगळेच आश्चर्यचकित झाले. शोरूमचे मालक आनंद गुप्ता यांनी या घटनेचे वर्णन 'कठोर परिश्रमाचा आदर' असे केले. ते म्हणाले, की अशी समर्पण वृत्ती फार दुर्मिळ आहे. आमच्या कर्मचाऱ्यांनी नाणी मोजण्यात दोन तासांपेक्षा जास्त वेळ घालवला. १०–२० रुपयांची अडीच हजारांहून अधिक नाणी पोत्यांमध्ये आणली होती. आम्ही स्कूटरची पूर्ण किंमत स्वीकारली आणि कुटुंबाला अतिरिक्त भेट म्हणून एक हेल्मेट सेट आणि सर्व्हिस व्हाउचर दिले. हे शेतकरी कुटुंब आमची प्रेरणा आहे.

स्कूटर खरेदी करताना मिळालेले गिफ्ट कूपन स्क्रॅच झाले, तेव्हा रामलाल कुटुंबाला खूप आनंद झाला. रामलालचे कुटुंब एक नवीन स्कूटर आणि मिक्सर ग्राइंडर घेऊन परतले. सर्वांचे चेहरे समाधानाने फुलले होते. स्थानिकांनी याला 'नाण्यांचा विजय' असे म्हटले आहे.



# या कुंडाची खोली किती?

भारतात असंख्य कुंड आहेत. काही कुंडांमधून गरम पाण्याचे झरे वाहत असतात. काही कुंडांमध्ये आंघोळ केल्यानंतर त्वचारोग बरे होत असल्याचा दावा केला जातो. अशाच एका कुंडाचं गुपित अजूनही उलगडलेलं नाही. हे कुंड म्हणजे भीमकुंड. या कुंडाची खोली किती हे कोणालाही माहीत नाही. भीमकुंडाची खोली अजूनही कोणाला मोजता आलेली नाही. याबद्दल फक्त अंदाजच बांधले जात आहेत. हे कुंड मध्य प्रदेशमधल्या छतरपूर जिल्ह्यापासून जवळपास ७० किलोमीटर दूर असणाऱ्या बाजना नामक गावात आहे. या कुंडाचा संबंध महाभारताशी जोडण्यात आला आहे. महाभारतात पांडव अज्ञातवासात होते. वेगवेगळे वेष करून इतस्त: भटकत होते. त्यावेळी त्यांना प्रचंड तहान लागली. मग भीमाने आपल्या गदेने जमीन खोदली आणि हे कुंड तयार केलं. या कुंडाचा आकार गदेसारखाच असल्याचं लोकांचं म्हणणं आहे. हे कुंड ४० ते ८० मीटर रूंद आहे. वरून साध्या दिसणाऱ्या या कुंडात बरीच रहस्यं दडली आहेत. हे कुंड एखाद्या नैसर्गिक आपत्तीबाबत सजग करत असल्याचंही सांगितलं जातं. आशिया खंडात भूकंप, सुनामीसारख्या घटना होणार असतील तर कुंडातलं पाणी वाढू लागतं. स्थानिक प्रशासनापासून नासाच्या शास्त्रज्ञांपर्यंत अनेकांनी या कुंडाची खोली जाणून घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले. पण कोणालाही काहीही मिळलं नाही. इथले लोक या कुंडातलं पाणी गंगेच्या पाण्याइतकं पवित्र असल्याचं मानतात.

# ब्लाऊज वेळेत न दिल्याचा भुर्दंड

कधीकधी एका छोट्याशा चुकीमुळेही मोठा त्रास होऊ शकतो. अहमदाबादमध्ये अशाच एका घटनेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. एका महिलेला तिच्या नातेवाइकाच्या लग्नासाठी ब्लाउजची आवश्यकता होती. परंतु शिंपी वेळेवर काम पूर्ण करू शकला नाही. प्रकरण तिथेच संपले नाही. तिने पैसे परत मागितले तेव्हा शिंप्याने नकार दिला. महिलेने हार मानली नाही आणि न्यायालयात गेली. काही महिने चाललेल्या या लढ्याचा निकाल अखेर तिच्या बाजूने लागला. न्यायालयाने शिंप्यावर ठपका ठेवत महिलेला नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले.

हे प्रकरण अहमदाबादच्या अंकुर परिसरातील रहिवासी पूनमबेन परिया यांच्याशी संबंधित आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये त्यांनी सीजी रोडवरील 'सोनी द डिझायनर शॉप' नावाच्या बुटीकमधून डिझायनर ब्लाउज ऑर्डर केला. हा ब्लाउज तिला एका लग्नात घालायचा होता. पूनमबेनन यांनी ४,३९५ रुपये आगाऊ दिले. लग्नाच्या एक आठवडा आधी ब्लाउज मिळणार होते.

लग्नाचा दिवस जवळ आला असतानाही ब्लाउज तयार नव्हते. पूनमबेन अनेक वेळा दुकानात गेल्या. त्यांनी तगादा लावला. शिंप्याने सांगितले, की फक्त एक किरकोळ समस्या आहे आणि लवकरच तो ती दुरुस्त करेल. असे असूनही, लग्नाच्या दिवसापर्यंत ब्लाउज मिळाले नाही. पूनमबेन यांना वेगळ्या पोशाखात लग्नाला उपस्थित राहण्यास भाग पडले. त्या म्हणाल्या, की लग्नासारख्या खास प्रसंगाचा सर्व उत्साह निघून गेला. कारण त्या ठरल्याप्रमाणे नियोजित कपडे घालू शकल्या नाहीत. पूनमबेन यांनी शिंप्याकडून तिचे पैसे परत मागितले, तेव्हा त्याने ते देण्यास नकार दिला.



शिंप्याने म्हटले, की तुम्ही ब्लाउज घेऊ शकता; पण तुम्हाला तुमचे पैसे परत मिळणार नाहीत.

पूनमबेन यांनी जून २०२५ मध्ये अहमदाबाद जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली. न्यायालयाने शिंप्याला धडा शिकवला. सुरुवातीला शिंपी सुनावणीदरम्यान उपस्थित राहिला नाही. चौकशी आणि सुनावणीनंतर, आयोगाने असा निष्कर्ष काढला, की शिंप्याने सेवेत कमतरता दाखवली आहे आणि ग्राहकाचे नुकसान केले आहे. आयोगाने शिंप्याला पूनमबेनचे ४,३९५ रुपये व्याजासहित ४५ दिवसांच्या आत परत करण्याचे आदेश दिले. पूनमबेनच्या मानसिक छळासाठी पाच हजार रुपये आणि कायदेशीर खर्चासाठी दोन हजार रुपये भरावे लागले. याचा अर्थ एकूण ११,५०० भरपाई द्यावी लागली.



# या शास्त्रज्ञांची अंगं आहे सुरक्षित

या जगात अनेक महान शास्त्रज्ञ होऊन गेले. या शास्त्रज्ञांनी लावलेल्या शोधांमुळे आपलं जीवन सुकर झालं आहे. म्हणूनच आठवण म्हणून जगातल्या तीन महान शास्त्रज्ञांच्या शरीराचा भाग आजही जपून ठेवण्यात आला आहे. गॅलिलिओ गॅलिलिने दुर्बिणीचा शोध लावला. गॅलिलीचं बोट, पाठीच्या कण्याचं हाड आणि अंगठा इटलीमधल्या फ्लोरेन्स शहरातल्या संग्रहालयात सुरक्षित ठेवण्यात आला आहे. १७३७ मध्ये त्यांचं शव एका कबरीतून दुसऱ्या कबरीकडे आणत असताना कोणी तरी त्यांची ही अंगं काढून घेतली. अल्बर्ट आईन्स्टाईन हे अत्यंत महान व्यक्तिमत्त्व. आईन्स्टाईनच्या मृत्यूनंतर त्यांचे डोळे काढून न्यूयॉर्कमध्ये सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले. इतकंच नाही तर, त्यांचा मेंदूही काढण्यात आला होता. त्यांच्या मेंदूवर अनेक शास्त्रज्ञांनी संशोधन केलं आहे. थॉमस एडिसनने बल्ब, फोनोग्राफ आणि कॅमेऱ्याचा शोध लावला. एडिसन यांच्या अंगाचा भाग नाही तर त्यांनी घेतलेल्या शेवटच्या श्वासाची हवा जपून ठेवण्यात आली आहे. हे ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. म्हणजेच एडिसनचा श्वास आजही अस्तित्वात आहे! हा श्वास एका शोधनळीत सुरक्षित आहे.

# नियम स्वित्झर्लंडमधले

जगात असाही एक देश आहे, जिथे गरीब असणे गुन्हा मानला जातो. कंगाल असणे म्हणजे सर्वोच्च गुन्हा आहे. त्यामुळेच या देशात शोधूनही भिकारी सापडत नाही. स्वित्झर्लंड असे या देशाचे नाव आहे. युरोपातील सर्वात समृद्ध देश म्हणून स्वित्झर्लंडकडे पाहिले जाते. या ठिकाणी शोधूनही कंगाल व्यक्ती सापडणार नाही. या देशात एकही व्यक्ती बेघर नाही. सरकारची वक्रदृष्टी या कंगालांवर असते. त्यामुळे कंगाल असणे या देशात बेकायदेशीर समजले जाते.

'सोशल मीडिया'तील एका पोस्टनुसार, येथील लोकांचे कमीत कमी मासिक वेतन चार हजार युरो एवढे आहे. बेरोजगारीवर शेवटच्या पगाराचा ८० टक्के हिस्सा मिळतो. रस्त्यावर सिगारेटचे थोटूक फेकल्यास ३०० यूरोची पावती फाडली जाते. ऐकायला हे विचित्र वाटते, पण हीच इथली शिस्त आहे आणि विशेष म्हणजे लोकही ही शिस्त पाळतात. १९व्या शतकापासून स्वित्झर्लंडची अर्थव्यवस्था विकसित होत आहे. त्यासोबतच या देशाने एक मजबूत सामाजिक जाळे विणले आहे. या देशात कोणीच रस्त्यावर झोपत नाही. कारण तुमच्याकडे घर नसेल तर सरकार तुम्हाला घर देते. 'फेडरल हौसिंग पॉलिसी'च्या अंतर्गत ६० टक्के लोकसंख्येला 'सब्सिडाइज्ड अपार्टमेंट' दिले जातात. आरोग्य सेवा तर जवळपास मोफत आहे.

बेरोजगारांना ८० टक्के पगाराचा हिस्सा भत्ता म्हणून दिला जातो. तसेच करिअर रिट्रेनिंग प्रोग्रामही फुकटात शिकवला जातो. 'स्विस फेडरल स्टॅटिस्टिकल ऑफिस'च्या मते देशाचा गरिबी दर ६.६ टक्के आहे. म्हणजेच या देशात एकही व्यक्ती उपाशी झोपत नाही. या देशाची आणखी एक खासियत म्हणजे स्वच्छता.



येथील रस्ते चकाचक असतात. हीच या देशाची खरी ओळख आहे. रस्त्यावर कचरा टाकल्यास तगडी रक्कम वसूल केली जाते. सिगारेटचे तुकडे फेकल्यावरही २५०–३०० फ्रँकचा दंड भसतो. १९८० मध्ये स्वित्झर्लंडमध्ये 'क्लीन स्वित्झर्लंड' म्हणून मोहीम सुरू करण्यात आली होती. त्याचाच हा एक भाग आहे.

देशात कचऱ्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. कचऱ्याच्या 'रिसायक्लिंग'चा रेट ५० टक्क्याहून अधिक आहे. गुन्ह्याचा दरही एवढा कमी आहे, की पोलिसांना नेहमीची हत्यारेसुद्धा नेण्याची गरज पडत नाही. फक्त १० टक्के पोलिसच बंदूक घेऊन फिरतात. 'यूएन क्राईम इंडेक्स' मध्ये स्वित्झर्लंड सर्वात सुरक्षित देशांच्या टॉप १० यादीत आहे. 'सिंगापूरच्या डेस्टिटयूट पर्सन्स' कायद्यानुसार या देशात भीक मागणे हा गुन्हा आहे. भीक मागितल्यास १८०० युरोचा दंड आणि तुरुंगवास ठोठावला जातो.



# फ्लाईट अटेंडटची चूक पडली ८८ लाखांना

आजच्या जगात, विमान प्रवास हा सर्वात जलद आणि सर्वात आरामदायी मानला जातो. लोक एका शहरातून दुसऱ्या शहरात काही तासांत प्रवास करू शकतात; पण कधीकधी एक छोटीशी चूक सर्वकाही बदलू शकते. 'डेल्टा एअरलाइन्स'च्या फ्लाइटमध्ये नेमके हेच घडले. एका फ्लाइट अटेंडंटच्या एका छोट्याशा चुकीमुळे संपूर्ण फ्लाइट तास न् तास थांबून राहिली. प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. ही घटना अमेरिकेतील पिट्सबर्ग विमानतळावर घडली. 'एअरलाइनला ८.८ दशलक्ष रुपयांचे (अंदाजे १.८ डॉलर दशलक्ष) चे नुकसानही झाले.

विमान पिट्सबर्गहून सॉल्ट लेक सिटीला जाणार होते. सर्व काही सामान्य होते. प्रवासी बसले होते आणि विमान टेकऑफसाठी तयार होते; पण नंतर एका फ्लाइट अटेंडंटने चूक केली. तिने चुकून आपत्कालीन दरवाजा वर केला. दरवाजा उघडताच, विमानाची आपत्कालीन स्लाइड आपोआप मागे सरकली आणि फुगली. विमानातून संकटाच्या वेळी बाहेर पडणे आवश्यक असताना हीच स्लाईड वापरली जाते. पण या वेळी स्लाईड चुकून उघडली. यामुळे केवळ उड्डाणाला उशीर झाला नाही, तर एअरलाइनचे मोठे नुकसानही झाले. आपत्कालीन स्लाईड पुन्हा पॅक करण्यासाठी ४० ते ८० लाख रुपये खर्च येऊ शकतो. यामध्ये प्रवाशांसाठी फ्लाईट विलंब, रीबुकिंग आणि हॉटेल खर्च समाविष्ट आहे.

विमानातील एका प्रवाशाने रेडिटवर घटनेचा फोटो शेअर केला. अटेंडंटने सर्व प्रवाशांची माफी मागितली आणि म्हटले, की तिने तिच्या २६ वर्षांच्या कारकिर्दीत कधीही अशी चूक केली नव्हती. या चुकीमुळे सुमारे चार तास उशीर झाला. या विलंबामुळे अनेक प्रवाशांच्या सॉल्ट लेक सिटीहून कनेक्टिंग फ्लाइट चुकल्या. 'डेल्टा एअरलाइन्स'ने तातडीने कारवाई केली आणि त्या रात्री किंवा दुसऱ्या दिवशीच्या फ्लाइटसाठी सर्व प्रवाशांचे पुन्हा बुकिंग केले. 'एअरलाइन'ने असेही म्हटले आहे, की ज्या प्रवाशांना रात्री राहावे लागले, त्यांच्यासाठी हॉटेलची व्यवस्था करण्यात आली होती.

# ‘भू माफिया’द्वारा अतिक्रमित जागा वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्रित यावे : आचार्य गुरुदेव गुप्तिनंदीजी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात न्याय द्यावा : अहिल्यानगर जैन मंदिर ट्रस्ट भुखंड प्रकरणी आवाहन



हिल्यानगर येथील जैन मंदिर ट्रस्टचा भूखंड संदर्भात ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी आचार्य गुरुदेव गुप्तिनंदीजी महाराजांची पुण्यात एचएनडी जैन बोर्डिंग येथे भेट घेतली.

नगर - अहिल्यानगर येथील जैन मंदिर ट्रस्टचा भूखंड संदर्भात ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी आचार्य गुरुदेव गुप्तिनंदीजी महाराजांची पुण्यात एचएनडी जैन बोर्डिंग येथे भेट घेतली. यावेळी त्यांनी भूखंड बळकवल्याच्या प्रकरणाची कागदपत्र, पुराव्यानिशी माहिती देत त्यांच्याशी चर्चा केली. या भेटी नंतर आचार्य गुप्तिनंदीजी यांनी सकल समाजाला हा भूखंड वाचवण्यासाठी एकत्रित पुढे येण्याचं आवाहन केलं आहे. यावेळी मनोज गुंदेचा, विकेश गुंदेचा, विलास उबाळे, अतुल जैन, सुकौशल जिंतूरकर, आनंद कांकरिया, स्वप्निल गंगवाल, अण्णासो पाटील, स्वप्निल बाफना, अनिल पटणी, राजेंद्रभाई शाह, शांतिनाथ जैन, जवाहर गुमने, दिलीप शांतिनाथ खोबरे आदींसह अनेक जैन बांधव यावेळी उपस्थित होते.

आचार्य गुप्तिनंदीजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील आवाहन केले असून या प्रकरणात त्यांनी न्याय द्यावा असे म्हटले आहे. अहिल्यानगरच्या सकल समाजाला त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून आवाहन केले आहे. आचार्य म्हणाले की, मंगूबाई व्होरा यांनी श्री ऋषभ संभव जैन श्वेतांबर संघाला (जैन मंदिर) जमीन दान केली होती. जैन साधू, संतांच्या या ध्यान स्थानावर आता अतिक्रमण झाले आहे. भू-माफियांनी त्याचा ताबा घेतला आहे. मी समाजातील सर्व लोकांना, समाजाच्या वारशासह, हे स्थान वाचवण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन करतो. मी सह-धर्मदाय आयुक्तांनाही या प्रकरणात न्याय देण्याची विनंती करतो. मी सर्व लोकप्रतिनिधींना आवाहन करतो की जैन समुदायावर असा अन्याय होऊ नये. जैन समुदाय नेहमीच देशभक्त राहिला आहे. तो देशा सोबत उभा राहील. जैन समाज कधीही अन्याय करत नाही. अन्याय होऊ ही देत नाही. म्हणून, संपूर्ण समुदायाने एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी उभे राहिले पाहिजे. माझे सर्वांना आशीर्वाद आहेत. सरकारने आमच्या हक्कांचे रक्षण करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

### ... तर आचार्यजी अहिल्यानगरला येणार

या भेटीनंतर बोलताना किरण काळे म्हणाले, जैन बांधव हा प्रामुख्याने व्यापारी आहे. स्थानिक पातळीवर त्यांच्यावर मोठा दबाव आहे. पुणे प्रकरणासाठी अहिल्यानगर मध्ये समाजाने रस्त्यावर उतरून मोर्चा काढला. त्यात आम्ही देखील पाठिंबा देत सहभागी झालो होतो. मात्र या स्थानिक प्रकरणामध्ये समाज पुढे यायला घाबरतो आहे. आम्हाला अनेकांचे फोन, मेसेज येत आहेत. ही लढाई पुढे न्यावी असे समाजाचे म्हणणे आहे. समाजाने घाबरू नये. जैन मंदिराची जागा वाचवणे हे पवित्र कार्य आहे. ती आपण वाचू शकलो नाही तर येणारी पिढी आपल्याला माफ करणार नाही. ही जागा वाचवण्यासाठी वेळ पडली तर आचार्य गुरुदेव गुप्तिनंदीजी महाराज यांनी स्वतः नगरला येण्याचे आश्वासन दिल्याची माहिती किरण काळे यांनी दिली आहे.

# जैन मंदिर ट्रस्टच्या जागेबाबत साठेखत, खरेदीखत व कुठलाही व्यवहार केला नाही

## सदर जागा भाडेकरुंच्या ताब्यात : ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष मुथा यांची माहिती



नगर - नगरमधील जैन मंदिर ट्रस्ट जागेबाबत किरण काळे यांनी केलेले सर्व आरोप जैन मंदिर कापड बाजार अहिल्यानगरचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी फेटाळून लावले आहेत.

माहिती देताना सुभाष मुथा म्हणाले, सदर जागा मंगुबाई हिरालाल व्होरा यांनी जैन मंदिर ट्रस्टला बक्षिस दिली आहे. ही जागा भाडेकरुंसह दिलेली असून या जागेत कधीही साधु, भगवंतांचे वास्तव्य नव्हते. तेथे कधीही सत्संग, व्याख्यान झालेले नाहीत. व्होरा यांनी जागा ट्रस्टला बक्षिस म्हणून दिल्यापासून सदर जागेचा टॅक्स ट्रस्ट महापालिकेला भरत आलेला आहे. सदर जागेतून कोणतेही उत्पन्न मिळत नसल्याने सदरील जागा विकण्याचा निर्णय ट्रस्टने घेतला होता. येणारे पैसे इतर ठिकाणच्या मंदिराला देणगी स्वरुपात देण्याबाबतचा विचार झाला होता. तसेच जागा बक्षिस देणाऱ्या मंगूबाई व्होरा यांचे नाव पैसे दान देऊन त्या ठिकाणी लावावे असे ठरले होते. याबाबत अंदाजे दोन वर्षांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये याबाबतची जागा विक्रीबाबतची जाहीर नोटीसही देण्यात आली होती. परंतू नोटीस दिल्यानंतर मंडळाच्या असे लक्षात आले की, सदर जागा विकता येणार नाही. त्यामुळे सदर जाहिर नोटीस स्थगित करुन जागेबाबत साठेखत, खरेदीखत किंवा इतर कुठलाही व्यवहार केलेला नाही. त्यामुळे जागा विक्रीबाबत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अर्जही दिलेला नाही व परवानगी मागितलेली नाही, असे सुभाष मुथ्था यांनी सांगितले.

पुणे येथे एचएनडी होस्टेलची जागा आहे. त्या जागेत दिगंबर जैन मंदिर आहे. तसेच होस्टेल आहे. परंतु व त्याचा खरेदी खताचा व्यवहार झाला होता. नगरमधील जागेची परिस्थिती वेगळी आहे. येथील जागेत कोणतेही मंदिर नाही, होस्टेल नाही. या जागेपासून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. व कुठलाही साठेखत व खरेदीखताचा व्यवहार झालेला नाही. त्यामुळे पुणे येथील जागा व नगरमधील जागा याची तुलना होवू शकत नाही, असे अध्यक्ष सुभाष मुथ्था यांनी सांगितले. नगरमधील जैन मंदिर ट्रस्टची जागा भाडेकरांच्या ताब्यात असल्याचेही त्यांनी सांगितले.

## महानगरपालिकेची प्रारूप मतदारयादी १४ नोहेंबरला प्रसिद्ध होणार

नगर - राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदार यादी कार्यक्रमात ४ नोव्हेंबरला बदल करण्यात आला असून आता महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १४ नोहेंबरला प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम २२ नोहेंबर असून प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्याची तारीख ६ डिसेंबर आहे. मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी ८ डिसेंबर रोजी प्रसिध्द करणे तसेच मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याची तारीख १२ डिसेंबर असणार आहे.

# नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी निर्णय अधिकारी नियुक्त

नगर - जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेमणुकीस मंजुरी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी उपरोक्त आदेश जारी केले असून, या नेमणुका शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार केल्या आहेत.

निवडणुकांचे कामकाज पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. नियुक्त अधिकारी निवडणुकीदरम्यान शासकीय मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करणार आहेत.

जिल्ह्यातील कोपरगाव नगरपरिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती भारती सागरे (उपजिल्हाधिकारी) असतील. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महेश सावंत (तहसीलदार, कोपरगाव) व सुहास जगताप (मुख्याधिकारी, कोपरगाव नगरपरिषद) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

संगमनेर नगरपरिषदेकरिता अरुण ऊंडे (उपविभागीय अधिकारी, संगमनेर) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी म्हणून धीरज मांजरे (तहसीलदार, संगमनेर) व श्रीमती धनश्री पवार (मुख्याधिकारी, अकोले नगरपंचायत) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीरामपूर नगरपरिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण सावंत पाटील (उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर) असतील, तर सहायक अधिकारी म्हणून मिलींदकुमार वाघ (तहसीलदार, श्रीरामपूर) व मच्छिंद्र घोलप (मुख्याधिकारी, श्रीरामपूर नगरपरिषद) कार्यभार सांभाळतील.

जामखेड नगरपरिषदेकरिता नितिन पाटील (उपविभागीय अधिकारी, कर्जत-जामखेड) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी म्हणून अजय साळवे (मुख्याधिकारी, जामखेड नगरपरिषद) व मच्छिंद्र पाडळे (नायब तहसीलदार, जामखेड) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

शेवगाव नगरपरिषदेकरिता प्रसाद मते (उपविभागीय अधिकारी, पाथर्डी-शेवगाव) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी म्हणून आकाश दहाडदे (तहसीलदार, शेवगाव) व श्रीमती विजया घाडगे (मुख्याधिकारी, शेवगाव नगरपरिषद) यांची नियुक्ती झाली आहे.

याशिवाय, पाथर्डी नगरपरिषदेकरिता सुभाष दळवी (उपजिल्हाधिकारी) यांची निवड झाली असून सहायक अधिकारी म्हणून उध्दव नाईक (तहसीलदार पाथर्डी) व दिग्विजय पाटील (नायब तहसीलदार, पाथर्डी) कार्यभार पाहतील.

राहाता नगरपरिषदेकरिता श्रीमती मनिषा राशीनकर (उपजिल्हाधिकारी) यांच्यासह सहायक अधिकारी अमोल मोरे (तहसीलदार, राहाता) व वैभव लोंढे (मुख्याधिकारी, राहाता नगरपरिषद) असतील.

राहुरी नगरपरिषदेकरिता अनुपसिंह यादव (उपजिल्हाधिकारी) निवडणूक निर्णय अधिकारी असतील, तर सहायक अधिकारी नामदेव पाटील (तहसीलदार, राहुरी) व सोपान बाचकर (नायब तहसीलदार,राहुरी) नेमले गेले आहेत.

देवळाली प्रवरा नगरपरिषदेकरिता श्रीमती गौरी सावंत (उपजिल्हाधिकारी) यांची निवड झाली असून सहायक अधिकारी म्हणून ऋषिकेश पाटील (मुख्याधिकारी, देवळाली प्रवरा नगरपरिषद) व डी.पी. शेकटकर (नायब तहसीलदार श्रीरामपूर) असतील.

नेवासा नगरपंचायतीकरिता सुधीर पाटील (उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर- नेवासा) यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून सहायक अधिकारी संजय बिरादार (तहसीलदार, नेवासा) व निखिल फराटे (मुख्याधिकारी, नेवासा नगरपंचायत) असतील.

शिर्डी नगरपरिषदेकरिता माणिक आहेर (उपविभागीय अधिकारी, शिर्डी) निवडणूक निर्णय अधिकारी असतील; सहायक अधिकारी म्हणून सतिश दिघे (मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद) व बी.बी. मुळे (नायब तहसीलदार राहाता) यांची नियुक्ती झाली आहे.

श्रीगोंदा नगरपरिषदेकरिता श्रीकुमार चिंचकर (उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर) निवडणूक निर्णय अधिकारी असतील, तर सहायक अधिकारी म्हणून सचिन डोंगरे (तहसीलदार श्रीगोंदा) व श्रीमती पुष्पगंधा भगत (मुख्याधिकारी, श्रीगोंदा नगरपरिषद) कार्यभार पार पाडतील.

सर्व नियुक्त अधिकाऱ्यांनी राज्य निवडणूक आयोगाने ठरविलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जारी आदेशांचे तंतोतंत पालन करून नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका २०२५ शांततेत, पारदर्शकतेने व सुव्यवस्थित पार पाडाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत.

## सीए अंतिम परीक्षेत ओंकार रोकडे उत्तीर्ण



नगर - दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया (नवी दिल्ली) यांच्यावतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत २२ व्या वर्षी ओंकार रोकडे हा यशस्वी झाला. ओंकारचे प्राथमिक शिक्षण मुठेवाडगावच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. बारावीनंतरचे शिक्षण पुणे येथे त्याने पूर्ण केले. केपीएमजी येथे त्याने आर्टिकलशिप केली. ओंकार हा श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव येथील कैलास एकनाथ रोकडे यांचे चिरंजीव आणि बीड जिल्ह्यातील अर्धपिंपरी येथील मूळ रहिवासी असलेल्या ओंकार रोकडे यांनी सीए परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांकडून त्याचे अभिनंदन करण्यात आले.

## सीए अंतिम परिक्षेत नेहा गांधी उत्तीर्ण



नगर - दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया (नवी दिल्ली) यांच्यावतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत नेहा गांधी हिने यश मिळवले. नेहा ही भिंगार येथील व्यापारी स्व. जयसुखलाल गांधी यांची नात व संपतलाल गांधी (मामाजी सप्लायर्स) यांची मुलगी तर केशरमल गांधी (मामाजी हार्डवेअर) यांची पुतणी आहे.

तिला नगर येथील सीए किरण भंडारी, सीए मुकेश कांकिया, सीए संदीप देसरडा, सीए प्रसाद भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले.

## सीए अंतिम परिक्षेत ममता संचेती उत्तीर्ण



नगर - दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया (नवी दिल्ली) यांच्यावतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत पटवर्धन चौक येथील ममता हेमंत संचेती उत्तीर्ण झाली.

सीए फायनल परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.

## काँग्रेस शहर जिल्हा उपाध्यक्षपदी नईम सरदार यांची नियुक्ती



नगर - अखिल भारतीय कमिटीचे केंद्रीय वर्किंग कमिटीने अहिल्यानगर शहर जिल्हा कार्यकारणीच्या नवीन कार्यकारणीला मान्यता दिली असून अखिल भारतीय कमिटी सचिव बी.एम. संदीप यांच्या मंजुरीने आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सूचनेनुसार दिप चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत सर्वांच्या मान्यतेने नगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीवर रामचंद्र खुंट येथील नईम सरदार यांची नियुक्ती करण्यात आली.

नईम सरदार हे मागील पंचवीस वर्षापासून अहमदनगर सोशल क्लब फाउंडेशन ट्रस्टच्या माध्यमातून सामाजिक काम करत आहे. शांतता समितीचे सदस्य आहे. व अहमदनगर जायका या हॉटेलचे मालक आहे. स्वतंत्रता सेनानी शेख चाँद यांचे ते नातु आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगर तालुकाध्यक्षपदी निवडीचे पत्र शरद पवार यांना देताना खा. निलेश लंके, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे व पदाधिकारी.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी शरद पवार यांची निवड

नगर -राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नगर तालुकाध्यक्षपदी खा. निलेश लंके यांचे विश्वासू सहकारी चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद पवार यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार व खा. निलेश लंके व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, किसनराव लोटके, माजी जि. प. सदस्य माधवराव लामखडे,बाळासाहेब हराळ,सरचिटणीस सिताराम काकडे, उपाध्यक्ष प्रकाश पोटे, उद्धवराव दुसुंगे, शरद बडे, केशव बेरड,पापामिया पटेल,चंदूकाका पवार यांच्या उपस्थितीत त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

यावेळी महाविकास आघाडीचे नेते व शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संपत म्हस्के, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके, बाजार समितीचे माजी चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, आबासाहेब कोकाटे, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र भगत, माजी सभापती प्रवीण कोकाटे, काँग्रेस तालुकाध्यक्ष अरुण म्हस्के, डॉ. मारुती ससे, गणेश तोडमल, महेंद्र शेळके, पोपट निमसे, संदीप कोकाटे, महादेव खडके, गटनेते वैभव कोकाटे, संदीप काळे, प्रकाश कांबळे, बाबा सय्यद, संतोष कोकाटे यांच्यासह नगर तालुक्यातील अनेक गावातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

सरपंच शरद पवार यांनी अनेक दिवसांपासून सर्वसामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे शासन दरबारी मांडलेले आहेत आणि निश्चित अहिल्यानगर तालुकाध्यक्ष पदाची त्यांच्याकडे धूरा आल्याने पक्षाची विचारधारा घेऊन सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवतील व ते शासन दरबारी लढतील असा आमचा विश्वास आहे, असे यावेळी खा.निलेश लंके म्हणाले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या दक्षिण जिल्हाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर



राष्ट्रवादी काँग्रेसच्या दक्षिण जिल्हाध्यक्षपदी माजी आ.दादाभाऊ कळमकर यांची नियुक्ती करून त्यांना शुभेच्छा देताना प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे. समवेत आ.रोहित पवार.

नगर - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार गट) अहिल्यानगर (दक्षिण) जिल्हाध्यक्ष म्हणून माजी आ. दादाभाऊ कळमकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांनी ४ नोव्हेंबर रोजी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

यावेळी आ. रोहित पवार उपस्थित होते. दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वीच राजेंद्र फाळके यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते.

गेल्या सात वर्षांपासून राजेंद्र फाळके यांच्याकडे जिल्हाध्यक्षपद होते. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त झाले होते. या पदी कोणाची वर्ण लागणार याची चर्चा होती. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची घोषणा देखील झाली असून निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादीला नवीन जिल्हाध्यक्ष मिळाले आहेत.

समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पक्षाची ध्येय-धोरणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे विचार सर्वदूर पोहोचविण्याचे कार्य दादाभाऊ कळमकर यांनी करावे, अशी अपेक्षा प्रदेशाध्यक्ष शिंदे यांनी व्यक्त केली आहे. या नियुक्तीबद्दल पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दादाभाऊ कळमकर यांचे अभिनंदन केले.

दादाभाऊ कळमकर हे पक्षाध्यक्ष शरद पवार यांचे एकनिष्ठ व विश्वासू म्हणून ओळखले जातात, जेव्हा जेव्हा पक्षाला त्यांची गरज असते तेव्हा तेव्हा ते धावून गेल्याचे पाहायला मिळत आहे. या निमित्ताने पुन्हा एकदा शरद पवारांचा विश्वासू शिलेदार त्यांच्या मदतीला धावून गेल्याचे दिसून आले.



## विजय शंकर मंदिरात आकर्षक रांगोळी

जनरल पोस्ट ऑफिस समोरील श्री विजय शंकर मंदिरात भगवान श्री कार्तिक स्वामी जयंती निमित्त आकर्षक व सुंदर अशा रांगोळीचे रेखाटन सौ. माधुरी साखला यांनी केले आहे.

(छाया - अमोल भांबरकर)

# शिंदे गटासोबत युतीतून जिल्हा परिषद, पंचायत समिती व महापालिकेत उतरणार



नगर - रिपब्लिकन सेनेची जिल्हा आढावा बैठक आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार शासकीय विश्रामगृह येथे झाली. या बैठकीत जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी रणनीती ठरविण्यात आली. या बैठकीला जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, बाळासाहेब वाघमारे, संजय ताकवाले, अतुल भिंगारदिवे, विलास पगारे, मेहेर कांबळे, पोपट रोकडे, रामदास माळी, मिलिंद सोनवणे, चंद्रकांत नरवडे, विलास गजभिव, अमोल जाधव, वैशाली शिरसाठ, कविता कवडे, सुनिता शिंदे, नेहा जावळे, रूपाली आयंची आदींसह जिल्ह्यातील तसेच नगर शहरातील महिला आघाडी व युवक आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान बोलताना जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांनी सांगितले की, येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी प्रत्येक गण व गटातील इच्छुक उमेदवारांची यादी तयार करण्यात आली असून ती शिवसेना (शिंदे गट) जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे व शहरप्रमुख सचिन जाधव यांना सादर केली जाणार आहे. रिपब्लिकन सेना आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या युतीतून अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी संयुक्त प्रचार मोहीम राबविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

शिंदे पुढे म्हणाले की, महानगरपालिका निवडणुकीसाठी देखील इच्छुक उमेदवारांची प्राथमिक यादी तयार करण्यात आली असून ती शिंदे गटाकडे देण्यात येणार आहे. सर्व पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनसंपर्क व प्रचाराची तयारी तातडीने सुरू करावी, अशा सूचना देण्यात आल्या. बैठकीत सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीनेही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. नगर शहरातील घरकुल योजनेपासून वंचित असलेल्या गोरगरीब नागरिकांना घर मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन सेना पुढाकार घेणार आहे. या संदर्भात आनंदराज आंबेडकर, शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे आणि शहरप्रमुख सचिन जाधव यांच्या समवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन घरकुल संदर्भात अडचणी मांडण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्षांनी सांगितले.

या बैठकीत आगामी निवडणुका लक्षात घेता रिपब्लिकन सेना आणि शिवसेना (शिंदे गट) युती मजबूत करण्यावर भर देण्यात आला.

## गोरक्षनाथ महाराज यांच्या प्रकटदिनानिमित्त नालेगाव अमरधाम मंदिरात कार्यक्रम



नगर - गुरु गोरक्षनाथ महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त नालेगावअमरधाम येथील गोरक्षनाथ मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पहाटे ५४०० कलशाने महाभिषेक करण्यात आला. त्या नंतर दुपारी पुष्पार्चन, बिल्वर्चन करण्यात आले तसेच रात्री महाआरती करण्यात आली. यावेळी नाथभक्त परिवार उपस्थित होता. त्यानंतर महाप्रसादचे वाटप करण्यात आले. यावेळी आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती तसेच विविध फळांचे भोग यावेळी दाखविण्यात आला होता. अनेक भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

